NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

दिनांक २३.११.२०२६ सोमवार

(कामगिरी)

नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–

दिनांक २१.११.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०६ केसेसमध्ये ०६ ईसमावर कारवाई करून एकुण १,३७,१६०/–रू. चा मुद्देमाल जप्त केला. तसेच, म.जु.का. कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०८ ईसमावर कारवाई करून एकुण ७,९६५/–रू. चा मुद्देमाल जप्त केला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये, ओव्हरस्पिडींग कलम ११२/१८३ मोवाका अन्वये ०१ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ४० केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १२७ मोवाका अन्वये ७१ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये १९० केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ७१ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ३५ केसेस, ड्रायव्हींग विदाऊट युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये १४ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ९१ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका अन्वये ०५ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये २९ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये १० केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,१११ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे कलम १८४ (सि) अन्वये १२ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये २१ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,८०७ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. २,८१,५५०/–रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

(गुन्हे)

१) पोलीस ठाणे गिट्टीखदान :– जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींना अटक.

पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, हजारी पहाड वस्ती, शिवमंदीर जवळ राहणाऱ्या फिर्यादी नामे श्रीमती उज्वला सुनिल सोमकुंवर, वय ४५ वर्षे यांचा मुलगा नामे आशिष सुनिल सोमकुंवर, वय २४ वर्षे हा दिनांक २२.११.२०२६ चे २१.०० वा. चे सुमारास हजारी पहाड वस्ती, पब्लीक टॉयलेट जवळ हजर असतांना तेथे आरोपी क्र. १) सागर ज्ञानेश्वर धुर्वे, वय २१ वर्षे, २) करण अनिल नायडु, वय २२ वर्षे, ३) श्याम अनिल नायडु, वय २१ वर्षे, सर्व रा. आशा बालवाडी जवळ, हजारीपहाड, गिट्टीखदान, नागपुर यांनी फिर्यादीचे मुलास दारू पिण्याकरीला पैशाची मागणी केली. त्याने पैसे देण्यास नकार दिल्याचे कारणावरून आरोपींनी संगणमत करून, फिर्यादीचे मुलास हातबुक्कीने मारहाण करून तसेच, आरोपी क्र. १ ने जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने

त्याचेजवळील चाकुने फिर्यादीचे मुलाचे पोटावर मारून गंभीर जखमी केले. गंभीर जखमी यांस उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले आहे. उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि. चॉद खान एस. पठाण ९९२३१४०७३४ यांनी आरोपींविरूध्द कलम १०९(१), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला व त्वरीत दखल घेवुन, आरोपींचा शोध घेवुन, तिन्ही आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

२) पोलीस ठाणे नविन कामठी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २१.११.२०२६ चे २१.३० वा. ते २२.११.२०२६ चे ११.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीत, मढी मंदीर, घोरपड रोड, एरीगेशन सोसायटी समोर, कामठी, नागपुर येथे राहणारे फिर्यादीचे आजोबा नामे मुन्नालाल यादव, वय ८४ वर्षे हे त्यांचे राहते घराला कुलूप लावून पत्नीसह गोंदीया येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे आजोबाचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून, घरात प्रवेश करून बेडरूममधील आलमारीतील रोख ५०,०००/—रू., सोन्याचे—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण ३,८६,०००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी सुमित गणेश यादव, वय ४३ वर्षे, रा. यादव नगर, कामठी, जि. नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नविन कामठी येथे पोउपनि. सतीष पवार ९८३४०६८८८१ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

३) पोलीस ठाणे बेलतरोडी :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

दिनांक २३.११.२०२६ चे ०२.३० वा. ते ०३.१५ वा. चे सुमारास, फिर्यादी नामे राघव मकरंद चांदुरकर, वय २० वर्षे, रा. प्लॉट नं. २६, नरेंद्र नगर, साईकृपा सोसायटी, सावित्री विहार अपार्टमेंट, नागपूर हे त्यांचा मित्र नामे धम्मदीप संदीपराव बासंदे, वय १८ वर्षे, रा. वडली, तह. वरूड, जि. अमरावती ह.मु.— अंबाझरी, नागपुर यांचेसह त्यांचे टिव्हीएस रायडर दुचाकी क्र. एम.एच २७ डि.क्यु ७१५९ ने पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, नरेंद्र नगर बोगद्याकडुन येवुन अरविंद सोसायटीकडे जाणाऱ्या रस्त्यावर वळण घेत असता, नरेंद्र नगर चौकाकडुन रेल्वे पुलाचे दिशेने छत्रपती चौकाकडे जाणाऱ्या काळ्या रंगाच्या किया सोनेट क्र. एम.एच ४० सि.एच ९१४३ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन रोडने जाणाऱ्या फिर्यादीचे मित्राचे दुचाकीला धडक दिल्याने, दुचाकी फरपटत जावुन, फिर्यादीचा मित्र गंभीर जखमी व फिर्यादी किरकोळ जखमी झाले. पोलीसांनी गंभीर जखमी फिर्यादीचा मित्र धम्मदीप यास उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल केले आहे. फिर्यादीचा उपचार करण्यात आला आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. ऋषीकेश कडुस यांनी कारचालक आरोपीविरूध्द कलम २८१, १२५(अ), १२५(ब), ३२४(४) भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा. का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

स्वा/—
(अंकुश राठोड)
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.